SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone: EPABX –2609000 PG Admission – 2609142 & 2609488 Fax : +91-231-2691533 & 2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन : इपीबीएक्स – २६०९१४२ पदव्युत्तर प्रवेष विभाग फॅक्स : ९१.२३१.२६९१५३३ व २६९२३३३
Estd. 1962
NAAC 'A'Grade
email: pgadmission@unishivaji.ac.in Website : www.unishivaji.ac.in

संदर्भ क्र.:पदव्युत्तर प्रवेश/शिवाजी वि.गुण. शिष्य./आरजीडी/53 (by email) दि. 17/12/2019

# परिपत्रक

प्रति,

१. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था,

२. अधिविभागप्रमुख/समन्वयक/संचालक
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय** :–सन २०१९–२०२० या शैक्षणिक वर्षातील "शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती" करिता ऑनलाईन नामाकंन अर्ज भरण्याकरीता मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ** :–पी.जी.प्रवेश/शिवाजी वि.गुण.शिष्य./आरजीडी/४४ दिं. १४/११/२०१९ रोजीचे परिपत्रक.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये "शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती" २०१९–२०२० करीता दि.९/१२/२०१९ पर्यंत नामांकन अर्ज भरण्याबाबत कळविण्यात आलेले होते. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची हार्ड कॉपी आवश्यक त्या कागदपत्रांसह व प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांच्या शिफारशीसह अर्ज दि. १६/१२/२०१९ पर्यंत विद्यापीठ कार्यालयात सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

तथापि महाविद्यालये/ पदव्युत्तर अधिविभागातील हिवाळी सत्रातील विद्यापीठाच्या परीक्षा व दुस–या सत्रातील सत्र समारंभाच्या तारखा विचारात घेता सदर शिष्यवृत्तीसाठी एकही विद्यार्थी वंचित राहू नये म्हणून शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीचे ऑनलाईन नामांकन अर्ज **दि.२६/१२/२०१९** अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे याची कृपया नोंद घ्यावी.

ज्या महाविद्यालये/ पदव्युत्तर अधिविभागानी यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरून घेतले आहेत अशा विद्यार्थ्यांचे पुन्हा अर्ज भरून घेवू नयेत. ऑफलाईन नामाकंन अर्ज विद्यापीठाकडे पाठवू नयेत. अशा अर्जाचा विचारही केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. गुणवत्ता यादीबाबत कांही अडचण असलेस संबधित परीक्षा विभागाशी संपर्क करून खातरजमा करावी. संकेतस्थळावर ठेवण्यात आलेल्या गुणवत्ता यादया संबधीत विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणाव्यात व ज्या पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे नामाकंन अर्ज ऑनलाईन भरून घेण्यात यावेत. यापुढे कोणत्याही सबबीवर अर्ज भरून घेण्याकरिता मुदत वाढ दिली जाणार नाही याची महाविद्यालये/ पदव्युत्तर अधिविभागानी नोंद घ्यावी.

..२

तेव्हा कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हयातील संलग्नीत महाविद्यालये/ पदव्युत्तर अधिविभागातील ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे **दि. २६/१२/२०१९** पर्यंत ऑनलाईन नामाकंन अर्ज भरून घ्यावेत व योग्य त्या आवश्यक कागदपत्रासह प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख/ समन्वयक यांच्या शिफारशीसह **दि. ३१/१२/२०१९** पर्यंत विद्यापीठ कार्यालयात पाठविण्यात याव्यात.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.व्ही.डी. नांदवडेकर)
कुलसचिव

सोबत :— वरील प्रमाणे

**प्रत माहितीसाठी** :

६. स्विय सहायक, मा. कुलगुरू, यांचे कार्यालय
७. स्विय सहायक, मा. प्र—कुलगुरू, यांचे कार्यालय
८. स्विय सहायक, मा. कुलसचिव, यांचे कार्यालय
९. स्विय सहायक, मा. वित्त व लेखाधिकारी, यांचे कार्यालय
१०.स्विय सहायक, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे कार्यालय

**माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी** :

५. प्र. संचालिका, संगणक केंद्र
६. उपकुलसचिव ऑन परीक्षा विभाग
७. विभागप्रमुख, सर्व ऑन परीक्षा विभाग
८. आवक विभाग :— सदर शिष्यवृत्तीसाठी येणारे अर्ज पदव्युत्तर प्रवेश विभाग येथे पाठविणेत यावेत.